**Navrashtra, Mumbai, 20/02/2026**
Page No: 2, Size: 29.98cm × 13.10cm

## Youth get work experience on Bullet Train project

# युवकांना बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामाचा अनुभव

### सुमारे २०० हून अधिक अभियंत्यांनी केला दौरा



**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** अनुभवाधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचएसआरसीएल) तर्फे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकाम स्थळांना युवा अभियंत्यांसाठी शैक्षणिक व तांत्रिक भेटींचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात २०० हून अधिक अभियंत्यांनी सहभाग घेत प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेतला. भारताच्या पहिल्या हायस्पीड रेल कॉरिडॉरमध्ये वापरल्या जाणाऱ्या बांधकाम पद्धती, अभियांत्रिकी अचूकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती अभियंत्यांना प्रत्यक्ष स्थळी देण्याच्या उद्देशाने या भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या. दौऱ्यादरम्यान सहभागी अभियंत्यांनी व्हायाडक्ट उभारणी, स्थानक विकास, पूल बांधकाम तसेच ट्रॅक बसविण्याची कामे प्रत्यक्ष पाहिली. यावेळी प्रकल्प अभियंते आणि साइट व्यवस्थापन पथकांसोबत संवादात्मक सत्रांचेही आयोजन करण्यात आले. या शैक्षणिक भेटीत प्रकल्प नियोजन, अंमलबजावणी, सुरक्षा उपाययोजना आणि गुणवत्ता नियंत्रण याबाबत सविस्तर माहिती युवा अभियंत्यांना देण्यात देण्यात आली.

**Sakal, Mumbai, 19/02/2026**

Page No: 5, Size: 9.15cm × 16.30cm

## Young engineers gain experience in bullet train project

# युवा अभियंत्यांना बुलेट ट्रेन प्रकल्पाचा अनुभव

मुंबई : अनुभवाधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचएसआरसीएल)तर्फे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकाम स्थळांवर युवा अभियंत्यांसाठी शैक्षणिक व तांत्रिक भेटींचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात २०० हून अधिक अभियंत्यांनी सहभाग घेत प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेतला. भारताच्या पहिल्या हायस्पीड रेल कॉरिडॉरमध्ये वापरल्या जाणाऱ्या बांधकाम पद्धती, अभियांत्रिकी अचूकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती अभियंत्यांना प्रत्यक्ष स्थळी देण्याच्या उद्देशाने या भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या.